# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला –४४४१०४
## निम्न कृषि शिक्षण

प्रा.डि.बी.तामगाडगे
सहयोगी अधिष्ठाता

फोन नं. ०७२४ २२५८७०६


क्र.सअ/निकृशि/मु.वा.प्रवेश/४१४/२०१३
निम्न कृषि शिक्षण, डॉ. पंदेकृवि, अकोला,
दिनांक : ३०.०८.२०१३

प्रति.

प्राचार्य
घटक/संलग्न कृषि तंत्र विद्यालय (सर्व),

प्राचार्य
खाजगी कायम विनाअनुदानित कृषि तंत्र निकेतन (सर्व),

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला कार्यक्षेत्र

**द्वारा** :– विद्यापीठाचे संकेतस्थळ **www.pdkv.ac.in**

**विषय** :– सन २०१३–२०१४ या शैक्षणिक वर्षाची कृषि तंत्र निकेतन पदविका प्रवेशाची वाढीव स्पॉट प्रवेश फेरी राबविण्याबाबत.

**संदर्भ** :– दिनांक २२.०८.२०१३ रोजी सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) समन्वय समिती यांची सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) डॉ.बा.सां.को.कृ. वि, दापोली यांचे कार्यालयात आयोजित केलेल्या बैठकीचा इतिवृत्तांत.

वरील संदर्भांकित प्रवेश सुचनेनुसार स्थळ प्रवेश (Spot admission) प्रक्रिया दि. २१.०८.२०१३ रोजी संपलेली आहे. परंतु सद्याच्या प्राप्त अहवालानुसार फक्त ३४:% जागा भरलेल्या आहेत. तद्ववतच मज्ञामकडे सर्व जिल्ह्यातुन पाहिजे त्या प्रमाणात अर्ज प्राप्त होवू शकले नाहीत आणि सद्यस्थितीत बऱ्याच ठिकाणी रिक्त जागा राहल्या आहेत.

यापूढील प्रवेश फेरी दि. ११.०९.२०१३ रोजी प्रवेश सोडून गेलेल्या किंवा रिक्त राहिलेल्या जागेकरिता मज्ञामची अंतिम गुणवत्ता यादी (दि. १८.०८.२०१३ रोजी प्रसिध्द झालेली) वापरायची आहे. परंतु यादीमध्ये उमेदवारांची संख्या नगण्य असल्यामुळे ज्या उमेदवाराने महाराष्ट्र ज्ञान मंडळाकडे अर्ज भरलेलाच नाही आणि प्रवेश घेवू इच्छितात अश्या उमेदवारांसाठी वाढीव स्पॉट ॲडमिशन फेरी जागा शिल्लक असल्यास (जेथे प्रवेश घ्यायचा असेल त्या निकेतनात) विनाअनुदानित कृषि तंत्र निकेतनात सोबत जोडलेल्या प्रवेश प्रणाली वेळापत्रकानुसार कार्यालयीन वेळेत स्वतः राबवावी यामध्ये कुठल्याही आरक्षणाचे वा जिल्ह्याचे बंधंन राहणार नाही. परंतु उमेदवार हा विदर्भातील असावा.

उमेदवाराने प्रवेशासंबंधीची माहिती पुस्तीका व प्रवेश अर्ज संबंधीत कृषि तंत्र निकेतनातुन दि. ३०.०८.२०१३ ते ०३.०९.२०१३ या कालावधीत रू. २५/– रोखीने भरून प्राप्त करावे. तसेच मज्ञामने तयार केलेल्या प्रवेश अर्जाचा नमुना संबंधीत कृषि तंत्र निकेतनाने आपले स्तरावर तयार करून खुल्या संवर्गासाठी रू. ३००/– व मागास संवर्गासाठी रू१५०/– आकारून दि. ३०.०८.२०१३ ते ०३.०९.२०१३ या कालावधीत भरून घ्यावा.

त्यानंतर दि. ०४.०९.२०१३ रोजी प्राप्त अर्जांची छानणी व गुणवत्ता यादी तयार करुन आपआपल्या जिल्ह्यातील प्रवेश प्रक्रिया राबविणारे घटक/संलग्न कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य यांचेकडून सर्व कागदपत्रे मुळ कागदपत्रावरून दि. ०५.०९.२०१३ ते ०६.०९.२०१३ या कालावधीत तपासुन दि. ०७.०९.२०१३ ते ०८.०९.२०१३ या कालावधीत गुणवत्ता यादीस विद्यापीठाची मान्यता घ्यावी.

विद्यापीठाने मान्यता दिलेली गुणवत्ता यादी दि. ०९.०९.२०१३ रोजी आपआपल्या कृषि तंत्र निकेतनात प्रसिध्द करुन विद्यापीठाने मान्यता दिलेल्या यादीनुसार आपआपल्या कृषि तंत्र निकेतनात प्रवेश प्रक्रिया दि. १०.०९.२०१३ ते ११.०९.२०१३ या कालावधीत कार्यालयीन वेळेत स्वतः राबवावी. प्रवेश प्रक्रिये दरम्यान विद्यार्थी स्वतः हजर राहणे अनिवार्य आहे.

यानंतर प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांच्या घटक/संलग्न कृषि तंत्र विद्यालयाच्या प्राचार्याकडून तपासून प्रमाणित करण्यात आलेल्या याद्या आणि वर जमा झालेल्या रकमेचा (वरील रू. २५/– सोडून प्रती अर्जदार रू. ३००/– किंवा रू. १५०/– प्रमाणे) धनादेश एकत्रितरित्या सहयोगी अधिष्ठाता, निम्न कृषि शिक्षण, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे नावे त्यांचे कार्यालयात सादर करावे.

घटक/संलग्न कृषि तंत्र विद्यालयांची स्थळ प्रवेश (Spot admission) प्रक्रिया दि. ११.०९.२०१३ रोजी माहिती पुस्तीका २०१३–१४ यामध्ये नमुद प्रवेश प्रणाली वेळापत्रकानुसार प्रवेश सोडून गेलेल्या किंवा रिक्त राहिलेल्या जागेकरिता मझामची अंतिम गुणवत्ता यादी (दि. १८.०८.२०१३ रोजी प्रसिध्द झालेली) वापरुनच पुर्ववत राबविण्यात येणार आहे.

**स्वाक्षरीत/–**
सहयोगी अधिष्ठाता
निम्न कृषि शिक्षण
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला.

प्रतिलीपी :–

१. मा. कुलगुरू यांचे स्विय सहाय्यक यांना मा. कुलगुरू, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे माहितीकरीता सविनय सादर.
२. कुलसचिव, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहितीकरीता सविनय सादर.
३. उपकुलसचिव (वि.वि.), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहितीकरीता अग्रेषित.
४. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना सदर पत्र व प्रवेश प्रणाली वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

## निम्न कृषि शिक्षण

रिक्त जागा भरणे प्रवेश प्रणाली वेळापत्रक २०१३-१४

| अ. क्र. | कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| १. | अर्ज विक्री सुरु होण्याचा दिनांक | ३०.८.२०१३ |
| २. | अर्ज विक्री व संपूर्ण भरलेले अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक | ३.९.२०१३ |
| ३. | अर्जाची छानणी करणे | ४.९.२०१३ |
| ४. | कृषि तंत्र निकेतन विद्यालयांनी विद्यार्थी गुणवत्ता यादी व विद्यार्थ्यांची मुळ कागदपत्रे त्या त्या जिल्हयातील घटक / संलग्न विद्यालयांच्या प्राचार्याकडून तपासून घेणे | ५.९.२०१३ व ६.९.२०१३ |
| ५. | गुणवत्ता यादीस विद्यापीठाची मान्यता घेणे | ७.९.२०१३ ते ८.९.२०१३ |
| ६. | गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | ९.९.२०१३ |
| ७. | विद्यापीठाने मान्यता दिलेल्या यादीनुसार विद्यार्थ्यांनी कृषि तंत्र निकेतन विद्यालय येथे प्रवेश घेऊन हजर होण्याचा दिनांक | १०.९.२०१३ ते ११.९.२०१३ |

स्वाक्षरीत/-
**कुलसचिव**
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला.